## विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई

जवाहर बालभवन, तळमजला नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४००० ००४
दुरध्वनी क्र. ०२२/२३६३००८१/८६ ईमेल- dydemumbai@yahoo.com

क्र.शिउसं/माध्य-२/ माअ /२०२२/ 357 दिनांक:- 14 SEP 2022

प्रति,
नितीन दळवी,,
१३२ /बी.२/९,दामोदर हरिदास बिल्डींग, टी एच कटारिया मार्ग,
माहिम मुंबई ४०००१६..

माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत माहिती उपलब्ध करून दिली
-विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई

**विषय:- आपला दिनांक २३/०८/२०२२ रोजीचा माहिती अधिकार अर्ज.**

उपरोक्त संदर्भान्वये आपण सादर केलेला माहिती अधिकार २३/०८/२०२२ रोजीचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे . सदर अर्जामध्ये १२/०८/२०२१ रोजीच्या शासननिर्णयानुसार या कार्यालयाच्या २२/०४/२०२२ च्या पत्रावर शिक्षण निरीक्षक (उत्तर /दक्षिण/पश्चिम)व शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) ठाणे/रायगड/पालघर यांच्या अनुपालन अहवालाच्या प्रती सांक्षाकित करून मागितल्या आहेत.

तथापि शिक्षण निरीक्षक (उत्तर /दक्षिण/पश्चिम)व शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) ठाणे/रायगड/पालघर यांच्या अनुपालन अहवाल या कार्यालयात प्राप्त झालेला नाही.

तसेच क्र २ मध्ये या कार्यालयाच्या २२/०४/२०२२ च्या पत्रावर शिक्षण निरीक्षक (उत्तर /दक्षिण /पश्चिम)व शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) ठाणे/रायगड/पालघर यांनी अंमलबजावणी, कार्यवाही, अनुपालन केले नसल्यास या संबधी केलेल्या कारवाईचे तपशील कागदपत्रे फाईल नोटींग सहीत सांक्षाकिंत करून मागतली आहेत.

सदर १२.०८.२०२१ च्या शासननिर्णयावर उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याचे निदर्शनास आल्याने पुढे कोणतीही कारवाई झालेली नाही.

सबब आपला सदरचा माहिती अधिकार अर्ज निकाली काढण्यात येत आहे. सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास आपण हे पत्र मिळाल्यापासून ४५ दिवसाचे आत प्रथम अपील अर्ज या कार्यालयाचे प्रथम अपिलीय अधिकारी, शिक्षण उपनिरीक्षक (माध्यमिक), मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे करू शकता.

(अल्पना चव्हाण)
जनमाहिती अधिकारी तथा अधीक्षक
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई.